पी.डब्लु.डी.व्ही.ए क्र. १६/२०२०
सीमा वि. संतोष
निशाणी क्र. ३२ खाली

**शपथेवर सरतपास पुन्हा सुरु.**
**सरतपास अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. के.एम. नेवरे यांच्यामार्फत** :-

मी अभिलेखावर निशाणी क्र. ३२ वर माझे शपथपत्र दाखल केले असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

२} मी निशाणी क्र. ३ सोबत अनुक्रमांक २ वर मी गैरअर्जदाराला दिलेल्या नोटीस उत्तराची प्रत दाखल केली आहे. त्यावर माझ्या विधीज्ञांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ३३** देण्यात येतो. मी निशाणी क्र. ३ सोबत अनुक्रमांक ३ वर मी गैरअर्जदाराला नोटीस उत्तर पाठविल्याबाबतची पावती दाखल केली आहे. त्यावर पोस्टाचा सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ३४** देण्यात येतो. मी निशाणी क्र. ३ सोबत अनुक्रमांक ४ वर गैरअर्जदाराच्या विधीज्ञांना नोटीस उत्तर मिळाल्याबाबतची पोस्टाची पावती दाखल केली आहे. त्यावर पोस्टाचा सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ३५** देण्यात येतो. मी निशाणी क्र. ३ सोबत अनुक्रमांक १ वर गैरअर्जदाराचे विधीज्ञ श्री. एम.जी. हरडे यांनी मला पाठवलेल्या नोटीसची प्रत दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ३६** देण्यात येतो. मी निशाणी क्र. २५ सोबत अनुक्रमांक १ वर माझ्या व गैरअर्जदार क्र. १ याच्या लग्नामध्ये मला ज्या भेटवस्तु मिळाल्या होत्या, त्याची मूळ प्रत दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझ्या व २ साक्षीदारांच्या सह्या आहेत. त्यास **निशाणी क्र. ३७** देण्यात येतो. मी निशाणी क्र. २५ सोबत अनुक्रमांक २ वर सोने व चांदीच्या दागिन्यांची पडताळणी केलेली बिले दाखल केली आहे. त्यावर एम.वाय. मरजीवे यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ३८** देण्यात येतो. मी निशाणी क्र. २५ सोबत अनुक्रमांक ३ वर कॅनॉन कंपनीची झेरॉक्स मशीन घेतल्याबाबतच्या बिलाची पडताळणी केलेली प्रत दाखल केली आहे. त्यावर दुकान मालकाची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ३९** देण्यात येतो. मी निशाणी क्र. २५ सोबत

अनुक्रमांक ४ वर कंप्युटर व मॉनिटरचे बिलाची पडताळणी केलेली प्रत दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर दुकान मालकाची सही आहे. त्यास **निशाणी क्र. ४०** देण्यात येतो. मी निशाणी क्र. २५ सोबत अनुक्रमांक ५ वर सी.पी.यु. च्या बिलाची पडताळणी केलेली प्रत दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर दुकान मालकाची सही आहे. त्यास **निशाणी क्र. ४१** देण्यात येतो.

३} अर्जदाराच्या विधीज्ञांनी आणखी काही महत्वाची कागदपत्रे दाखल करायची असल्याने सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

सरतपास अपुर्ण.

श्रवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

रामटेक. (एच.एस.सातपुते)

दिनांक : १८/०९/२०२४. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, रामटेक.